# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.-४२२००२

दुरध्वनी क्रमांक:- ०२५३ २५७२०६२

E mail ID- dir_swm@nmc.gov.in


जा.क्र.मनपा/घ.व्य.वि /स्वभाअ/कार्या.क्र.. /७७८ /२०२० दिनांक २० /११ /२०२०

### जाहीर प्रकटन

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभाग अधिनियम -२०१६ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत असून शहरात दैनंदिन कचरा संकलन, कचरा वर्गीकरण व शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ शहराचे ७ स्टार मानांकन प्राप्त करण्याकरिता कार्यवाही प्रस्तावित असून त्या अंतर्गत वॉटर प्लस प्रोटोकॉल बाबत निश्चित करून दिलेल्या निकषांची पूर्तता नाशिक महानगरपालिके मार्फत करण्यात येत आहे. त्या मध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत.

१. सांडपाणी प्रक्रिया केंद्राची नियोजीत क्षमता मल:निस्सारण वाहिनीला जोडलेल्या घरांच्या संख्येसाठी विकेंद्रित किंवा केंद्रीकृत प्रक्रिया केंद्राद्वारे प्रति घरातील ५०० एलपीडी (किंवा प्रत्येक व्यक्तीसाठी १०० लिटर)प्रक्रिया करण्यासाठी पुरेसे आहे.
२. शहरातील सर्व सेप्टिक टाक्या साठी आवश्यक तेवढे डी-स्लाझिंग वाहने उपलब्ध आहेत.
३. सर्व सेप्टिक टाक्या दर तीन वर्षात यांत्रिकी पद्धतीने डी- स्लाझिंग केल्या जातात
४. शहरात मल:निस्सारण प्रक्रिया केंद्राची सुविधा उपलब्ध आहे
५. पावसाळी पाण्याचे नाले आणि मल.निस्सारण वाहिन्या यांत्रिकी पद्धतीनेच पावसाळ्यापूर्वी व नंतर नियोजित वेळापत्रक नुसार साफ केले जातात.
६. पावसाळी पाण्याच्या नाल्यांमध्ये कोणताही कचरा अढळून येत नाही आणि दुय्यम ते प्राथमिक नाले व प्राथमिक नाले व प्रमुख नाले यांच्या जोडणीवर लोखंडी जाळ्या लावलेल्या आहेत.
७. कोणताही अपघात / कचरा टाकण्यापासून वाचण्यासाठी सर्व मॅनहोल संरक्षित / बंदीस्त केलेले आहेत.
८. शहरातील मलप्रक्रिया करण्यात आलेल्या पाण्याच्या ५१% पेक्षा जास्त पाण्याचा पुनर्वापर नाशिक जिल्ह्यातील शेतीसाठी जलसंपदा विभागामार्फत करण्यात येते.
९. नागरिकांकडून स्वच्छता सेवा शुल्क वसुली ४८% जास्त करण्यात येत आहे.
१०. सांडपाणी , सिवेज ओव्हरफ्लो संबंधित नागरिकांच्या प्राप्त तक्रारींपैकी ९०% पेक्षा जास्त विहित कालमर्यादेत निकाली काढण्यात आलेल्या आहेत.
११. दररोज ५०० लिटर पेक्षा अधिक सांडपाणी निचरा करणाऱ्या सर्व औद्योगिक अस्थापना, बांधकाम साईट (२०००० पेक्षा अधिक चौ. फूट) यांनी शून्य लिक्विड डिस्चार्ज (ZLD) राखण्याबाबत घोषणा पत्र सादर केले आहे.
१२. सांडपाणी वाहून नेणारी यंत्रणा आणि मॅनहोलमधून कोणतंही सांडपाणी ओसांडून वाहून जात नाहीत.
१३. मल:निस्सारण वाहिण्यांचे नेटवर्क आणि मॅनहोल वेळावेळी साफ केले जातात.
१४. नाल्यांची वेळोवळी देखभाल/ दूरूस्ती चांगली केली जाते.
१५. मल:निस्सारण वाहिणी नेटवर्क / एसटीपी / एफएसटीपी चे ऑपरेशन्स आणि देखभाल खर्च सर्मपित महसूल प्रवाहाद्वारे वसूल केले जात आहेत.
१६. तुंबलेली गटार, सांडपाण्याची गळती. पाण्याचे नळ, सेप्टिक टाकी साफसफाई, उघडलेले मॅनहोल, ड्रेन क्लीनिंग यासंबंधी सर्व स्वच्छता / स्थानिक ॲप तक्रारींचे निवारण एसएलएममध्ये प्रमाणित केले प्रमाणे हात आहे.

तरी , नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, नाशिक महानगरपालिकेस वॉटर प्लस प्रोटोकॉल प्राप्त करण्याकरिता आपल्या काही हरकती असल्यास उप आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग नाशिक महानगरपालिका राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.-422002 यांचेकडे किंवा नाशिक महानगरपालिकेच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर हे प्रकटन जाहीर झाल्यापासून १५ दिवसात लेखी स्वरुपात नोंदवाव्यात.

**नाशिक**
**दिनांक :२०/११/२०२०**

२०/११/२०२०

**(कैलास जाधव,भा.प्र.से)**
**आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

Scanned with CamScanner